| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण**<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक – पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


**प्रेस नोट** दिनांक : १४/०२/२०२४

## इगतपुरीत अवैध गुटख्यासह ४६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत
## नाशिक ग्रामीण पोलीसांची कारवाई

---

महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार मानवी आरोग्याच्या दृष्टीने गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू तसेच मानवी आरोग्यास हानीकारक असणा-या खाद्यपदार्थांची विक्री, उत्पादन, साठवणुक, वाहतुक आदी व्यावसायांना प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे. त्या पार्श्वभूमीवर नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे मार्गदर्शन व सूचनांप्रमाणे ग्रामीण पोलीसांची जिल्हाअंतर्गत गुटख्याची वाहतूक, विक्री, वितरण व साठवणूक करणा-यांविरूध्द कारवाई सुरू आहे.

दिनांक १४/०२/२०२४ रोजी मध्यरात्रीचे सुमारास मुंबई आग्रा महामार्गाने मालेगाव मार्गे मुंबई बाजूकडे काही संशयीत इसम मालवाहू कंटेनर मध्ये गुटख्याची अवैधरित्या वाहतुक करून विक्री करण्याचे उद्देशाने जाणार असल्याची गोपनीय माहिती मालेगाव शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. तेघबीर संधु यांना मिळाली होती. सदर बातमीप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे पथकाने मुंबई आग्रा महामार्गावर टाके-घोटी, इगतपुरी शिवारात छापा टाकून, आयशर कंपनीचा कंटनेर क्रमांक डी.डी.-०१-एफ-९१०२ यामध्ये अवैधरित्या गुटख्याची वाहतुक करणारे इसम नामे **१) अमृत भगवान सिंह,** वय ४२, रा. वडवेली, पो. हिनौतीया, ता.खिलचीपुर, जि.राजगड, मध्यप्रदेश, २) **पुनमचंद होबा चौहान,** वय ५१, रा. सकारगाव, ता. बिकनगाव, जि.खरगोन, मध्यप्रदेश यांना ताब्यात घेतले. सदर इसम हे **कंटनेरमध्ये सोयाबीनच्या गोण्यांच्यामागे लपवून,** चोरटया रितीने गुटख्याची वाहतुक करतांना मिळून आले आहे. त्यांचे कब्जातून **एस.एच.के. सुगंधीत गुटख्याचा २१,०२,४००/- रूपये** किंमतीचा अवैध गुटखा व कंटनेर क्रमांक डी.डी.-०१-एफ-९१०२ असा एकुण ४६,२३,४००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील ताब्यात घेतलेले इसम हे महाराष्ट्र राज्यात उत्पादन, साठा व साठयास प्रतिबंधीत असलेला गुटखा, सुगंधीत/स्वादीष्ट तंबाखू, पानमसाला, सुगंधीत स्वादीष्ट सुपारी व तत्सम गुंगीकारक पदार्थ मानवी शरीरास सेवन करण्यास अपायकारक आहे, हे माहिती असतांना देखील स्वत:चे फायद्यासाठी अवैधरित्या गुटखा विक्री करण्याचे उद्देशाने कब्जात बाळगातांना मिळून आले असून त्यांचेविरूध्द **इगतपुरी पोलीस ठाणेस गुरनं ३१/२०२४** भादवि कलम ३२८,२७२,२७३,१८८,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास इगतपुरी पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार करीत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी मालेगाव शहर विभाग श्री. तेघबीर संधु यांचे मार्गदर्शनानूसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, पोउनि दत्ता कांभिरे, पोकॉ मनोज सानप यांनी सदरची कारवाई केली आहे. गुटखा विरोधी कारवाई आणखी तीव्र करण्यासाठी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या असून, याकामी पोलीसांकडून व्यापक स्वरूपात कारवाई करण्यात येणार आहे.